DOIs:10.2018/SS/202401011 --:-- Research Paper / Article / Review

# चार्वाक दर्शनातील मूळ श्लोक : अर्थ आणि संकल्पना

**गोरोबा तुकाराम खुरपे**
संशोधक विद्यार्थी
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,
विष्णुपुरी, नांदेड (महाराष्ट्र)
Email : gtkhurpe@gmail.com

**डॉ. संजय हणमंतराव पाटील**
सहयोगी प्राध्यापक
देगलूर महाविद्यालय, देगलूर
जि. नांदेड (महाराष्ट्र)
Email : sanpatdegloor@gmail.com

**सारांश :**

*यावत्जीवेत् सुखं जीवेत्,*
*ऋणं कृत्वा घृतं पिबेत्*
*भस्मीभूतस्य देहस्य, पुनरागमनं कुत :?*

चार्वाक तत्त्वज्ञानात हा मुख्य श्लोक प्रसिद्ध आहे. परंतु या श्लोकावर आधारित आरोप विरोधकांनी केले ते असे की, चार्वाक दर्शनाचे अनुयायी बेजबाबदार आणि चारित्र्यहिन आहेत. कारण चार्वाक दर्शन उपरोक्त श्लोकाप्रमाणे अधिक व्याजाने ऋण घेऊन चैन - मजा करण्यास सांगते शिवाय घेतलेल्या ऋणाची परतफेडही न करणे हे बेजबाबदारपनाचे आहे अशा आरोपाचे सूर विरोधकांनी लावले. असे असले तरी चार्वाक दर्शनात अधिक व्याजाने ऋण घेऊन चैन करा - मजा करा आणि घेतलेले ऋण फेडू नका असा निर्देश दिलेला नाही.

चार्वाक दर्शन हे इहवादी, ऐहिक व वस्तूनिष्ठ दर्शन आहे त्यामुळे ऋण घेणे ही एक अर्थशास्त्रीय व्यवस्था म्हणून सांगिलेले आहे. मानवाने जीवनाविषयी केवळ भ्रामक आणि अवास्तव कल्पना करून रडत-पडत जीवन जगणे चार्वाक दर्शनाला मान्य नाही. मानवाने प्रसंगी कर्ज काढावे मात्र आपले अस्तित्व टिकवावे कारण एकदा मिळालेला मानवी देह नष्ट झाला तर तो पुन्हा प्राप्त करता येत नाही, त्यामुळे जोपर्यंत जीवन आहे तोपर्यंत ते सुखा-समाधानाने जगावे एवढेच चार्वाक दर्शनाला सांगायचे होते.

**मुख्य संज्ञा :** श्लोक, विवेकी बंड, इहवादी, ऐहिक, भूतेभ्य:चैतन्यम् .

## 1. प्रस्तावना :

भारताच्या सामाजिक इतिहासातील विज्ञाननिष्ठ, विवेक प्रामाण्य मानणारे एक धगधगते व्यक्तिमत्व. वर्षानुवर्षाच्या अन्यायावर व शोषणावर उत्तरे शोधणारी विचारसरणी म्हणजे चार्वाक होय. इतिहासकालीन अशिक्षीत, पिचलेल्या व गांजलेल्या सर्वसामान्य माणसाच्या श्रध्दाळू मनाचा गैरफायदा तत्कालीन प्रस्थापितांनी घेतला, बहुसंख्य लोकांची पिळवणूक केली, त्यांना जनावरांचे जिने जगावयास लावले. हे करित असताना सर्व हक्क, अधिकार, खरे - खोटे ठरविण्याची न्याय पध्दती या ना त्या मार्गाने आपल्याच हातात ठेवण्याचे कौशल्य तत्कालीन प्रस्थापितांनी दाखविले. त्यांच्या या व्यवस्थेवर आसूड ओढणारे व स्वतंत्रपणे विवेकाने व्यवस्थेचे वाभाडे काढणारे व्यक्तिमत्व म्हणजे चार्वाक! अन्यायी प्रस्थापित व्यवस्थेविरूध्द विवेकी बंडाचा झेंडा उंच धरणारे क्रांतिकारक म्हणजे चार्वाक! तत्कालीन सर्वच धार्मिक ग्रंथांनी मांडलेल्या व मानलेल्या उच्छादी सिध्दांतांची कठोर चिकित्सा करणारे '*उमदे समाजसुधारक*' म्हणजे चार्वाक!

'चारू वाक्' म्हणजे आवडेल असे बोलणारा आणि चार्वाक दर्शनालाच लोकायत असेही म्हणतात. लोकायत म्हणजे इंद्रिये जाणतात तेवढेच जग! चार्वाक हे बंडखोर दर्शन आहे. वेद, ईश्वर, आत्मा, कर्मफल, परलोक हे काहीच ते मानत नाहीत. आणखी वेगळेपण म्हणजे ते केवळ प्रत्यक्ष हेच एकमेव प्रमाण मानतात. प्राचीन भारतातील ही इहलोकवाद '*लोकायत*' या नावानेच प्रामुख्याने ओळखला जातो. चार्वाकांनी आत्मा, परलोक, पूर्वजन्म-पूनर्जन्म इत्यादी कल्पना असिद्ध ठरवून हे इहलोकवादाने तार्किक समर्थन केल्याने या विचाराला '*चार्वाक दर्शन*' हे नाव प्राप्त झाले. चार्वाक दर्शन हे देव, दैव अध्यात्म इत्यादी संदर्भात नास्तिक दर्शन वाटले तरी ते शेती, व्यापार, उद्योग करून धन कमवून सुखाने जगावे असे

सांगते. हे लक्षात घेता चार्वाक दर्शन हे अस्तिकवादी म्हणजे जीवना संदर्भातील सकारात्मक दर्शन ठरते. प्रा. डॉ. आ. ह. साळुंखे यांनी चार्वाकास '*आस्तिकशिरोमणी*' संबोधले आहे याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

**2. संशोधनाची उद्दिष्टे :**

१. चार्वाक दर्शनातील मूळ श्लोकाचा अभ्यास करणे
२. चार्वाक दर्शनातील मूळ श्लोकाचे लावलेले विविध अर्थ पाहणे.
३. चार्वाक दर्शनातील मूळ श्लोकाचे लावलेले विविध अर्थांचे विवेचन करणे
४. चार्वाक दर्शनातील मूळ श्लोकाच्या लावलेल्या विविध अर्थांचे चिंतन करणे.

**3. संशोधन पद्धती :**

संशोधकाने प्रस्तुत शोधनिबंधाचे लेखन करण्याच्या साठी ग्रंथालयीन पद्धतीचा वापर अधिक प्रमाणात केलेला आहे यामध्ये विविध संदर्भ ग्रंथांचा अभ्यास करण्यात आलेला आहे. ऐतिहासिक पद्धती बरोबरच अनेक दुय्यम साधनांचाही वापर या संशोधन लेखाच्या अनुषंगाने केलेला आहे. त्याचबरोबर सदरील संशोधनासाठी नियतकालिके, वर्तमानपत्रातील आणि संकेतस्थळावरील विविध तज्ञांची मते विचारात घेऊन निष्कर्ष काढण्यात आलेले आहेत.

**4. चार्वाक दर्शनातील मूळ श्लोकाचे विवेचन :**

चार्वाक दर्शन हे प्राचीन काळातील भौतिकवाद आहे आणि हा भौतिकवाद देहवादावर आधारलेला होता. चार्वाक दर्शनात देह व आत्मा यात फरक केला जात नाही तर देहालाच आत्मा मानतात. शरीरात जोपर्यंत चैतन्य असते तोपर्यंत जीवन, चैतन्य संपले की मृत्यू ! चार्वाक दर्शनात मोक्ष नाकारून स्वातंत्र्य स्वीकारले त्यामुळे या दर्शनानुसार जीवन, स्वातंत्र्य आणि सुख हे मानवाला प्राप्त झालेले मूलभूत अधिकार आहेत. भारताच्या दार्शनिक इतिहासात अद्वितीय स्थान असलेल्या तर्कनिष्ठ आणि बुद्धिप्रामाण्यवादी चार्वाक दर्शनाला इतर सर्व दर्शनांनी - अगदी जैन व बौद्ध या नास्तिक दर्शनांनीसुद्धा तुच्छ लेखले. त्यांच्या युक्तिवादांना पटण्याजोगी उत्तरे देता येईनात म्हणून सर्वांनी त्यांची यथेच्छ निंदा केली. चार्वाक मताप्रमाणे जे ज्ञान इंद्रियांच्या द्वारे बुद्धीला होते तेच अस्तित्वात आहे असे समजले जाते. चैतन्य हे जडापासूनच निर्माण होते. चैतन्याला वेगळे अस्तित्व नाही आणि देह नष्ट झाला की तेही नष्ट होते. आकारामुळे निराकाराचा भास होतो, निराकार असे काही नाही, फक्त आकारच आहे. चार्वाकांची निंदा करण्याकरिता, ते अविचारी व भोगवादी होते, या मताचा पुरावा म्हणून वारंवार सांगितला जाणारा, 'कर्ज काढूनही तूप प्या' असे सांगणारा, चार्वाकांचा म्हणून सर्वदर्शनसंग्रहात आलेला मूळ श्लोक असा आहे –

*यावत्जीवेत् सुखं जीवेत्,*
*ऋणं कृत्वा घृतं पिबेत्*
*भस्मीभूतस्य देहस्य, पुनरागमनं कुत :?*

म्हणजे जोपर्यंत जगायचे, तोपर्यंत सुखाने जगावे. कर्ज काढून तूप प्यावे कारण भस्म झालेले शरीर पुन्हा कसे बरे परत येणार ?

'*बहिस्पत्यसूत्र*' या ग्रंथातील हा ४५ वा श्लोक / सूत्र म्हणून वेगवेगळ्या विचारधारांनी आपापल्या भूमिकानुसार या श्लोकाचा अर्थ काढून वापर केलेला दिसतो. यामध्ये एक मांडणी चार्वाकांच्या दृष्टीकोनातून केलेली आहे तर दुसरी मांडणी किंवा भूमिका ही चार्वाकावरील आरोपांची आहे. प्रस्तुत संशोधन लेखात या दोन्ही भूमिका बाजूला ठेवून सदरील श्लोकाचा जो अर्थ निघतो तोच गृहीत न धरता त्याचा व्यापक अर्थाने तसेच चार्वाक विचार तत्त्वज्ञानाच्या दृष्टीकोनातून अभ्यास करण्याचा प्रयत्न आहे.

जवळपास अडीच हजार वर्षापूर्वी नास्तिकतावाद आणि भौतिकतावाद यांचा पुरस्कार करणारा आणि जातिव्यवस्थेच्या अस्तित्वाच कारण नाकारणारा एक माणूस या भरतखंडात होऊन गेला तो म्हणजे चार्वाक ! त्याने ह्या जन्माच्या आधी आणि नंतर काही असत या विचारालाही छेद दिला. हाच विचार पुढे नेऊन जे काही आहे ते याच जन्मात, हा जन्म हे मागील जन्मातल्या कृत्याच फळ आहे आणि या जन्मातील कर्मांच फळ पुढच्या जन्मी मिळेल हे तत्वज्ञान चुकीच आहे असा विचार चार्वाकाने मांडला. त्यामुळे आनंदाने हे जीवन जगा, एकदा मेल्यावर पुनर्जन्म कुठला? असे चार्वाक सांगतो. तसेच देव-दानव, भूत-प्रेत, आत्मा असलं काही नसतं. समाजात जी काही कर्मकांड आहेत त्यांच्या वाढीला ब्राम्हण कारणीभूत आहेत ह्या विचाराचा चार्वाक पुरस्कर्ता होता.

इसवी सनाच्या पहिल्या-दुसऱ्या शतकात ग्रीसमध्येही असाच एक मतप्रवाह होता. त्याला एपिक्युरियन पंथ असे म्हणतात. याचा आद्य प्रवर्तक एपिक्युरस हा त्याच्या अनुयायांना घेऊन एका मोठ्या बागेत राहत असे. तेथेच सर्वांच्या कुटी होत्या. यांचे ध्येयवाक्य होते - *' खा! प्या! मजा करा! '* एकदा अथेन्सचा राजा बागेमध्ये सुखोपयोग घेणारी माणसे पाहण्यासाठी गेला, त्याला वाटले की तेथे सर्व सुखसाधने असलेले ऐश्वर्यसंपन्न जीवन जगणारी माणसे त्याला दिसणार मात्र तेथील चित्र वेगळेच होते बागेमध्ये सर्व माणसे आनंदाने कामे करत होती. संध्याकाळी सर्व माणसे एकत्र येऊन गायन – वादन व नृत्य केली. भोजनाकरिता त्यांना अत्यंत साधे अन्न होते परंतु सर्वांनी ते साधे अन्न – भोजन आनंदाने खाल्ले आणि स्वअस्तित्व व निसर्ग यांना आजच्या जीवनासाठी धन्यवाद दिले. हा सर्व प्रकार राजा पाहताच राहिला आणि मनी विचार करू लागला की, हे असेच असेल तर मग यांना अधार्मिक – नास्तिक का म्हटले जाते?
चार्वाक दर्शनातील उपरोक्त मूळ श्लोकाचे विवेचन पुढीलप्रमाणे केले आहे –

**अ. यावत्जीवेत् सुखं जीवेत् - *जोपर्यंत जगायचे, तोपर्यंत सुखाने जगावे*:**

१. चातुर्वर्ण्य हे संस्कृतीचे अधिष्ठान मानायलाही त्यांचा विरोध होता कारण मानवी जीवन हे एकदाच मिळते यावर त्यांचा कटाक्ष होता. प्रत्येक माणसाचे जीवन किती दिवस आहे हे सांगता येत नाही त्यामुळे मानवाने सुखाने जगावे असे चार्वाक दर्शन सांगते.
२. ऐतिहासिकदृष्ट्या येणारी वंशशुद्धी व तिच्यामुळे येणारा अहंकार यावर चार्वाकांनी कठोर टीका केली. वंशशुद्धी ही वस्तुस्थिती नसून आभास आहे, तो आपले वरिष्ठत्व टिकविण्यासाठी केलेला प्रचार आहे असे चार्वाक मानतात. त्यामुळे माणसाने जोपर्यंत जगायचे, तोपर्यंत सुखाने जगावे.
३. चार्वाक दर्शनात पारलौकिक भ्रमाच्या पाठीमागे लागून आजचा दिवस खोटा करणे म्हणजे रडत-पडत जगणे ही बाब मान्य नाही. मानवी जीवन हे अमुल्य आहे त्यामुळे ते किती व्यवस्थित जगता येईल यावर मानवांनी भर दिला पाहिजे.
४. मानवी जीवन सुखाने जगण्यासाठी चार्वाकांनी आपल्या दर्शनात या मूळ श्लोकाच्या माध्यमातून दिलेला सल्ला अतिशय महत्वाचा आहे. विरोधकांनी या मूळ श्लोकाचा अर्थ शब्दशः घेऊन संकुचितपणा समोर आणण्याचा केलेला प्रयत्न हा अत्यंत चुकीचा आहे.

**ब. ऋणं कृत्वा घृतं पिबेत्- *कर्ज काढून तूप प्यावे*:**

१. चार्वाक दर्शनाचा खरा अर्थ दूरच राहिल्याचे दिसून येते कारण त्याच्या तत्त्वज्ञानाचा वरवरचा अर्थ गृहीत धरून त्याला बेजबाबदार ठरविण्यात आले. अधिकच स्पष्टपणे सांगायचे झाले तर त्याची *'धार्मिक'* मनुस्मृतीबरोबर तुलना करायला काय हरकत आहे ? कर्ज काढून तूप प्यायला सांगणारा चार्वाक आणि दुसऱ्याची संपत्ती लुबाडून आपला यज्ञ पुरा करायला सांगणारा दरोडेखोर यातील अधिक हिन कोण ? कर्जापेक्षा दरोडा अधिक नैतिक आहे का ? कर्ज काढून तूप पिण्यापेक्षा दरोडा घालून तूप जाळणे अधिक चांगले आहे का ? पण दोष कोणाला द्यायचा हा मूळ प्रश्न शिल्लक राहतो. मात्र चार्वाक दर्शनाचा त्याच्या विरोधकांनी काढलेला संकुचित अर्थ बाजूला करून व्यापक अर्थ लक्षात घेतला तर त्यातील मर्म समजून येते.
२. या चरणांचा आधार घेऊन चार्वाक हे नीतिनियम न पाळणारे होते असा विपर्यास केला जातो. घेतलेले ऋण फेडू नका असे चार्वाकांनी कधीही सांगितलेले नाही. चार्वाकांनी ऋणाविषयी बेजबाबदारपणा मान्य केला नाही. वेदांच्या परंपरेतल्या यज्ञयाग, पूजा अर्चा, अग्निहोत्र, श्राद्ध, स्वर्ग-नरक,कर्म-कर्मफल, पूर्वजन्म-पूनर्जन्म, मोक्ष या सर्व कल्पना व कर्मकांड ही लोकांना लुबाडण्यासाठी, स्वार्थी हितसंबंधीयांनी निर्माण केलेले मायाजाल आहे.
३. यज्ञाच्या अग्नीत तूप जाळून अलौकिकाच्या अभिलाषा करण्यापेक्षा ते तूप पिऊन शरीर व मन धष्टपुष्ट व समर्थ करा असा लौकिक जीवनाबाबतचा सम्यक अर्थ त्यांनी सांगितला. प्रस्थापित हितसंबंधांवर आधारलेला धर्म नाकारून विधायक मार्ग दाखवून देण्याचे कार्य चार्वाकांनी केले. ऋणाला भिण्याचे कारण नाही आणि तूप पिण्यातही काही पाप नाही. संकटांनी खचून जाऊ नका, कर्तबगारीने संकटांवर मात करा व स्वतःच्या कष्टाचा आस्वाद स्वतःच घ्या हा या तत्त्वज्ञानाचा मूलमंत्र सर्वांनाच सारखा आहे.
४. चार्वकांनी रुणाविषयी बेजबाबदारपणा मान्य केला नाही. समाजाला नियंत्रित करण्यासाठी दंडनीती नावाच्या स्वातंत्र विद्येचा पुरस्कार त्यांनी केला. चांगली कृत्य, न्याय प्रशासन आणि कल्याणकारी शासन याचा चार्वाकांनी आग्रह धरला. अर्थात ऋण घ्या असे जरी चार्वाकांनी म्हटले असले तरी त्यावर दंडनीती, न्याय प्रशासन आणि कल्याणकारी शासन यांचा अंकुश ठेवला आहे तसेच चार्वाक दर्शनात मानवाने चांगली कृत्य करावीत असे सांगितले आहे. मग विनाकारण ऋण घेणे, घेतलेले ऋण बुडविणे असा येथे अर्थ निघत नाही – होत नाही.

५. कर्ज घेऊन तूप प्या सांगितल्याने चार्वाक तत्त्वज्ञानाला बाधा येत नाही की चंगळवादाचे समर्थन होत नाही. व्यक्तीला अथवा समाजाला काहीही उपयोग नसलेल्या गोष्टीसाठी व्यर्थ खर्च करण्याची मनोवृत्ती म्हणजे चंगळवाद असे म्हणता येईल. तूप खाणे ही चंगळ नव्हे.ते यज्ञात जाळणे ही चंगळ. काल्पनिक स्वर्गाच्या प्राप्तीसाठी अनेक लोक यज्ञात तुपाचे हवन करतात म्हणून चार्वाक सांगतो, तूप आगीत जाळू नये तर ते खावे. त्यासाठी वाटल्यास कर्ज काढावे.आरोग्य चांगले ठेवावे. काम करून, धन मिळवून कर्ज फेडावे आणि सुखात राहावे. चार्वाकाचे विचार व्यावहारिक आणि वास्तववादी आहेत.

**क. *भस्मीभूतस्य देहस्य, पुनरागमनं कुत:? - भस्म झालेले शरीर पुन्हा कसे बरे परत येणार?***

१. चार्वाकांनी ऋणाविषयी बेजबाबदारपणा मान्य केला नाही. समाजाला नियंत्रित करण्यासाठी दंडनीती नावाच्या स्वतंत्र विद्येचा पुरस्कार त्यांनी केला. वेदांच्या परंपरेतल्या, यज्ञयाग, पूजाअर्चा, अग्निहोत्र, श्राद्ध, स्वर्ग-नरक, कर्म-कर्मफल, पूर्वजन्म- पूनर्जन्म, मोक्ष या सर्व कल्पना व कर्मकांड ही लोकांना लुबाडण्यासाठी, बनेल हितसंबंधीयांनी निर्माण केलेले भ्रमजाल आहे.

२. मानव जो जगतो ते ऐहिक जीवनच खरे आहे. शेती, व्यापार, गोपालन, प्रशासन आणि उपयुक्त शास्त्रांचे अध्यापन अशा साधनांनी काम करून द्रव्य मिळवावे आणि सर्व सुखोपभोग मिळवून नीतीने जगावे. स्वातंत्र्य हे सर्वश्रेष्ठ मूल्य आहे असे चार्वाक दर्शनात मानतात कारण त्यांनी मोक्षाचा स्विकार केलेला नाही.

३. देहापेक्षा भिन्न असा आत्मा मानून त्याच्या परलोकातील गतीच्या चिंतेत इहलोकी दुःखात राहणे हा शहाणपणा नाही. ते असेही सांगतात की जसे गूळ, तांदूळ, पीठ व पाणी यांच्यात मद्याचे गुण नसतात, परंतु हे एकत्रित केल्याने मद्य तयार होते तसेच *'भूतेभ्य: चैतन्यम्'* म्हणजे महाभूतांच्या मिश्रणाने तयार झालेल्या शरीरात वेगळे असे चैतन्य दिसते. ते शरीरासोबतच नाहीसे होते.

४. चार्वाक सृष्टीकर्त्या ईश्वराचे अस्तित्व मानत नाहीत. त्यांच्या मते सृष्टीच्या स्वाभाविक, भौतिक नियमांनुसार जगातील सर्व घटना घडतात. चार्वाक दर्शनात देहालाच आत्मा मानलेले आहे आणि शरीरात जोपर्यंत चैतन्य आहे तोपर्यंतच जीवन आहे. त्यामुळे जोपर्यंत जीवन आहे तोपर्यंत ते सुखाने जगावे. आत्मा, पूर्वजन्म – पूनर्जन्म असे काहीही नसते, देहाबरोबरच चैतन्यही लोप पावते.

उपरोक्त विवेचनावरून असे दिसून येते की, चार्वाक दर्शनातील श्लोकाचा वरवरचा अर्थ म्हणजे जोपर्यंत जगायचे, तोपर्यंत सुखाने जगावे. कर्ज काढून तूप प्यावे कारण भस्म झालेले शरीराचे पुनरागमन कोठून होणार ? येथे तूप हे सुखाचे रूपक म्हणून वापरले आहे. मनुष्य शारीरिकदृष्ट्या कमकुवत असेल तर त्याला कुडत-कुडत जीवन जगावे लागेल मात्र निरोगी-मजबूत शरीर असेल तर सुखासमाधानाने जीवन व्यतीत करता येईल. मूळ श्लोकाच्या आशयावर व्यापकतेने दृष्टी टाकून अर्थ लावला तर चार्वाकांना नेमके हेच म्हणायचे आहे की, प्रसंगी कर्ज काढा पण तूप प्या, त्यामुळे यामध्ये चार्वाकांनी कर्ज उगाचच घ्या, घेतलेले कर्ज बुडवा किंवा कर्जाचा वापर करून अनैतिक बाबी करा असे म्हटलेले नाही.

चार्वाक दर्शन हे चोहोबाजूने परिपूर्ण आहे असे नाही मात्र या दर्शनाने त्या काळातील प्रस्थापितांविरुद्ध संघर्ष केला हे महत्वाचे आहे. लोकजीवन सुखी झाले पाहिजे हा आज महत्व पावलेला विचार चार्वकांनी त्याकाळात उचलून धरला होता याला महत्व आहे. चार्वाक तत्त्वज्ञानातील मूळ श्लोकाचा निघणारा अर्थ आणि प्रत्यक्षातील अर्थ सारखाच निघत नाही तर चार्वाक तत्त्वज्ञानातील मूळ श्लोकाचा निघणारा अर्थ वरवर पाहता संकुचित स्वरूपाचा आहे मात्र चार्वाक तत्त्वज्ञानातील मूळ श्लोकाचा मतितार्थ हा खूपच व्यापक असा आहे.

## 5. चार्वाक दर्शनातील मूळ श्लोकाच्या लावलेल्या विविध अर्थांचे चिंतन :

चार्वाक दर्शनातील मूळ श्लोकाच्या लावलेल्या विविध अर्थांचे चिंतन पुढीलप्रमाणे करण्यात आले आहे -

चार्वाकांनी कर्ज काढावे असे सांगितले मात्र ते फेडू नये असे सांगितले नाही कि अधिक व्याजाने काढावे असे पण सांगितले नाही अर्थात व्यक्तीने आपली क्षमता पाहून कर्ज काढावे. गरजेपोटी माणसाने कर्ज जरूर काढावे आणि ते फेदावेही कारण सद्यः स्थितीत एखादा छोटा - मोठा उद्योजक असेल आणि त्याला आपला व्यवसाय वाढवायचा असेल तर कर्ज काढण्याशिवाय काय पर्याय आहे ? तसेच एखादा नौकरदार असेल आणि त्याला गाडी - बंगला अथवा घर करण्यासाठी कर्ज घेणे अपरिहार्य आहे. चार्वाकांनी कर्ज काढून *'तूप प्या'*, असे सांगितले मात्र सोमरस. मदिरा किंवा दारू प्या असे नाही. चार्वाकांनी कर्ज काढून *'तूप प्या'*, असे सांगितले ते .*'यज्ञात जाळून टाका'* याला चार्वाक दर्शनात विरोध केलेला आहे.*'तूप प्या'* म्हणजे येथे चांगले अन्न खा असाही अर्थ होतो. कर्ज काढून नशापाणी करायला चार्वाक दर्शनात

सांगितलेले नाही. आस्तिकतेच्या क्षेत्रात अन्नाला '*पूर्णब्रह्म*' म्हटलेले आहे, असे असले तरी दूषित - विटलेले अन्न प्रसाद म्हणून भक्षण करावे का ? येथे असे म्हणता येईल की, सकस अन्न खाणे हा प्रत्येकाचा अधिकार आहे आणि याकरिता ऋण काढावे लागले तरी काय हरकत आहे !

चार्वाक दर्शनात प्रत्येक माणूसाला सुखी जीवन जगण्याचा अधिकार आहे कर्ज घेणे ही बाब जेवढी माणसाच्या सुखाशी निगडित आहे असेच स्व-अस्तित्व टिकविण्यासाठी आहे, तेवढीच त्यात जबाबदारीही आहे. सूत्र शैलींतील श्लोकांचा वाच्यार्थ न घेता त्यांचा आशय पाहता चार्वाकांच्या मूळ श्लोकाचा आशय असा आहे की, "प्रसंग पडल्यास कर्जही घ्या मात्र ते कर्ज शेती, पशुपालन, व्यापार, उद्योगधंद्यासाठी वापरा, कष्ट करा; उत्पादन करा आणि नेहमी तूप पिता येईल असे '*समर्थ बना*'. कर्जफेड करून आयुष्य सुखाने जगा आणि पारलौकिक भ्रमाच्या पाठीमागे लागू नका, तूप उगाच यज्ञात जाळून टाकण्यापेक्षा - कर्मकांड करण्यापेक्षा ते तुमच्या शरीराच्या आरोग्याच्या कामी येऊ द्या. हा सल्ला कुठल्याही काळात सामान्य जनतेला उपयोगी होईल असा योग्य व उपयुक्त सल्ला हा चार्वाकांच्या '*विवेकी*' बंडाने दिला आहे.

**संदर्भसूची :**


१. सदाशिव, आठवले, *चार्वाक : इतिहास आणि तत्त्वज्ञान*, वाई, प्रज्ञा पाठशाळा, १९८०
२. साळुंखे, आ.ह . *आस्तिकशिरोमणी* , सातारा, लोकायत प्रकाशन १९९२
३. गाडगीळ, स.रा . *लोकायत*, मुंबई, लोकवाड्मय गृह, १९७४
४. गोखले, प्रदीप, *तत्त्वचिंतक चार्वाक*, पुणे, मनोविकास प्रकाशन, २०१३
५. कुंभार १४६ जोड अंक (संपादकिय) विचारशलाका ,नागोराव ,-१४९ २०२४ ते मार्च २०२३ एप्रिल ,वे ३८ वर्ष ,
६. झा, आचार्य आनंद, *चार्वाकदर्शन*, लखनऊ, उत्तर प्रदेश हिन्दी संस्थान २०१३
७. Chattopadhyaya, Debiprasad, *Lokayata : A Study in Ancient Indian Materiallism*, Delhi, 1959
८. Radhakrishnan, S. *History of Philosophy-Eastern and Western*, London, 1952
९. https://iep.utm.edu/indmat/